ISSN : 2277 - 8721
Electronic Interdisciplinary International Research Journal
(EIIRJ)
A Peer Reviewed Interdisciplinary Journal
SJIF Impact Factor: 6.21
Volume–IX Issues–V Sept – Oct. 2020

साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त
एक दिवशीय राष्ट्रीय परिषद

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील विविध पैलू

आयोजक
शहीद पोचीराम कांबळे स्वयंसहाय्यता बचत गट, नांदेड

मुख्य संपादक
डॉ. अशोक जाधव

सहसंपादक
डॉ. प्रकाश भांगे
डॉ. प्रकाश सुर्यवंशी

# साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची साहित्यसंपदा

प्रा. राजीव किशनराव वाघमारे
ग्रंथपाल
नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय,नांदेड

बहुजन जनतेला माणुसकीचे जीवन जगता यावे, त्यांचा सर्वांगीन विकास व्हावा म्हणून राजर्षी शाहु महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा ज्योतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य जसे अजरामर, अविस्मरणीय आहे त्याच प्रमाणे साहित्य क्षेत्रात अण्णा भाऊ साठे यांचे ही आहे.

बहुजनांच्या जीवन जाणीवांच स्पष्ट प्रतीबींब जर कुणी साहित्यबध्द केल असेल तर ते अण्णा भाऊ साठे यांनी. जनसामान्यात अण्णा भाऊ साठे म्हणुन प्रसिध्द अथवा ओळखले जाणारे तुकाराम भाऊराव साठे यांचा जन्म 1 ऑगस्ट 1920 रोजी वाटेगाव तालुका वाळवा जिल्हा सांगली येथे झाला. शिक्षणाने अशिक्षीत असुन सुध्दा ते एक महान लेखक, साहित्यीक म्हणुन जगप्रसिध्द झाले.

अण्णा भाऊ  हे शाळेत शिकले नाहीत, केवळ दिड दिवस ते शाळेत गेले. उच्चवर्णियांच्या भेदभावामूळे त्यांनी शाळा सोडून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स, लेनिन, मॅक्झी गार्की आणि श्रीपाद डांगे यांचा वैचारिक वारसा घेवून जातीव्यवस्था, अर्थव्यवस्था यांच्याशी  सतत त्यांनी संघर्ष सुरु ठेवला. अण्णा भाऊ साठे हे साहित्य युगातील एक प्रतिभावंत विद्रोही विचार व सामाजिक परिवर्तनातील क्रांती संघर्ष आहे. सामान्य कष्टकरी जनतेच्या मनामध्ये अन्यायाविरुध्द लढण्यासाठी आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी लावण्या, पोवाडे गीते, पद इत्यादी काव्य प्रकारचे शस्त्र त्यांनी उचलले. ज्यांना येथील मनुवादी संस्कृतीने माणुस म्हणून जगण्याचा अधिकर दिला नाही त्यांना अण्णा भाऊ साठेनी आपल्या साहित्यात नायक बनविले. चटणी भाकरी खावुन, विहीरी खोदून इतरांना पाणी पाजणारे, खाणीतून कोळसा पुरविणारे, गडकिल्ले, राजवाडे बांधणारे उपेक्षित कामगाराच्या घामाची व्यथा साहित्यातुन अण्णा भाऊ नी मांडली. त्यांनी उपेक्षित, शोषीत पिडीत बहुजन समाजाचे दुःख जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी साहित्य निर्मिती केली. शाहीरीच्या माध्यमातुन संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आणि त्यांनी स्थापन केलेल्या 'लाल बावटा' पथकाच्या माध्यमातुन लोकप्रिय शाहीर म्हणुन शाहीरीमध्ये मानाचा ठसा उमटवला. स्वातंत्र्य नंतरच्या काळामध्ये राजकीय प्रश्नाविषयी शाहीरीच्या माध्यमातुन मोठी जनजाग्रती केली. 'ये आझादी झुठी है, देश की जनता भुकी है' असा नारा देऊन जनसामान्यांच्या मुलभुत प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली. जगप्रसिध्द फकिरा ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंझार लेखनीला अर्पण करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारासंबंधी असणारा आदर त्यांनी व्यक्त केला.